## कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण किंवा MSETCL), नियुक्त राज्य पारेषण संस्था हयांच्या अधिकारांमध्ये, तात्पुरत्या हस्तांतरण योजनेच्या आधारे वित्तीय वर्ष २००४-२००५ मधील प्रत्यक्ष खर्च व महसूल, वित्तीय वर्ष २००५-२००६ मधील सप्टेंबर २००५ पर्यंतच्या प्रत्यक्ष रक्कम आणि ऑक्टोबर २००५ पुढील प्रस्तावित तसेच वित्तीय वर्ष २००६-२००७ साठी प्रस्तावित रक्कमा यांच्या आधारे वित्तीय वर्ष २००६-२००७ मधील एकूण महसूलाची गरज व वीज दर निर्धारणाकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ अनुसार वीज दर याचिका सादर करीत आहे.

## महापारेषण (MSETCL) चा वीज ताळमेळ

महापारेषण कंपनीच्या पारेषण प्रणालीतील पारेषण हानी वित्तीय वर्ष २००४-२००५ मधील अति उच्च दाब पातळीवरील वाहिन्यांच्या ऊर्जा अंकेक्षण अहवालाच्या आधारे ६% च्या मर्यादेत आहे. म्हणून महापारेंष्ण कंपनीने एकूण हाताळाव्या लागणा-या वीजेच्या परिमाणा वर ६% पारेषण हानी गृहीत धरली आहे. महापारेषण कंपनीच्या वित्तीय वर्ष २००५-२००६ आणि वित्तीय वर्ष २००६-२००७ मध्ये अनुक्रमे एकूण ६९७३१ द.ल.यु. व ७८४५६ द.ल.यु. वीज हाताळणे प्रस्तावित आहे.

## महापारेषण यांची एकूण महसूलाची गरज

दि. ५ जून २००५ पूर्वी म.रा.वि. मंडळ हा उपक्रम अस्तित्वात असल्याने आणि त्यांच्याकडील एकूण खर्चातून महापारेषण यांचा खर्च वेगळा काढण्यात आल्याने १ एप्रिल २००५ ते ५ जून २००५, ६ जून २००५ते ३० सप्टेंबर २००५ या काळातील अलेखापरिक्षित खर्चाचा स्वतंत्र तपशील महापारेषण यांना देण्यात आला. आर्थिक वर्ष २००५-२००६ करिता खर्चाचा अंदाज, एकूण खर्चाच्या या आधीच्या धर्तीवर करण्यात आला आहे. वर्ष २००६-२००७ करिता खर्चाचे अंदाज या आधीच्या धर्तीवर आणि महापारेषण यांच्या वाटयास आलेल्या खर्चावर आधारित राहून तयार केले आहेत.

(क) कर्मचा-यांवरील खर्चाचे अंदाज (वेतन पुनरिक्षण) सुधारित वेतन, महागाई भत्त्यातील सर्व साधारण वाढ, मूळ वेतन व अन्य भत्ते यांमध्ये ४% किरकोळ वाढ, यासर्व खर्चाचा परिणाम लक्षात घेऊन तयार केले आहेत.
(ख) आस्थापना विषयक व सर्वसाधारण खर्च यामध्ये ५% वाढ गृहित धरली आहे.
(ग) देखभाल व दुरुस्ती यावरील खर्च आरंभीच्या ढोबळ वित्तीय हिशेबावर १.५% असा अंदाजित केला आहे.
(घ) घसारा खर्च आरंभीच्या ढोबळ हिशेबाच्या आधारे वर्ष २००४-२००५ आणि २००५-२००६ करिता ५.९% सरासरी दराने अंदाजित केला असून तो सन्माननीय आयोगाने आधीच्या म.रा.वि.मंडळास घसा-यासाठी मान्य केलेल्या ६.३% या घसारा दरापेक्षा कमी आहे. आर्थिक वर्ष २००६-२००७ करिता घसा-याचे प्रमाण आयोगाचे य (वीजदराच्यसा अटी व शर्ती) विनियम २००५ यामध्ये विहित केलेल्या घसारा दरानुसार अंदाजित केले आहे.
(च) तात्पुरत्या हस्तांतरण योजनेअन्वये, महापारेषण यांच्या वाटयास आलेल्या अदत्त कर्जासाठी दिर्घकालीन कर्जावरील व्याज, जास्तीची कर्जे व परतफेडीचा कार्यक्रम लक्षात घेऊन ठरवले आहे. आर्थिक वर्ष २००४-२००५ मधील अदत्त कर्जामध्ये महाराष्ट्र शासनाच्या काही कर्जाचा समावेश असून ती कर्जे म.रा.वि. मंडळास दिलेली होती. तात्पुरत्या हस्तांतरण योजनेनुसार शासनाची कर्जे, महापारेषण सहित नंतर निर्माण करण्यात आलेल्या कंपन्याच्या वाटयास न देता म.रा.वि. मं. सूत्रधारी कंपनी या अवशिष्ट कंपनीने धारण केलेली आहेत. तथापि, वर्ष २००५-२००६ आणि २००६-२००७ मधील व्याज खर्चाचा अंदाज करते वेळी, ही कर्ज सेवा महापारेषण कंपनी वापरत असल्याने त्यावरील व्याजाचे दायित्व महापारेषणकडे असेल, असे मानण्यात आले आहे.
छ) व्याजाचा सरासरी दर १३.४% (२००१-२००२) वरुन सुमारे ११.७% (२००४-२००५) आसा कमी झाला आहे आणि २००५-२००६ व २००६-२००७ या आर्थिक वर्षात ११% पर्यंत घसरेल अशी अपेक्षा आहे.
ज) महापारेषण यांनी आर्थिक वर्ष २००६-२००७ व त्यापुढील वर्षांकरिता आपला भांडवली खर्चाचा कार्यक्रम (रोलिंग प्लॅन) तयार केला असून २००६-२००७ मध्ये रु. १०५४ कोटी गुंतवणूक करावी लागेल, असे गृहीत धरले आहे.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

झ) आयोगाने ऑगस्ट २००५ मध्ये अधिसूचित केलेल्या विनियमातील (वीज दराच्या अटी व शर्ती) यानुसार भांडवली खर्चाकरिता कर्ज व समभाग यांचे प्रमाण ७०:३० असे मानण्यात आले आहे.

ट) महापारेषण यांनी आर्थिक वर्ष २००५-२००६ करिता आयकर खात्याकडे प्रत्यक्षात भरलेल्या आगाऊ करानुसार आर्थिक वर्ष २००५-२००६ आणि २००६-२००७ करिता आयकर दायित्वाचा अंदाज तयार केला आहे. यापूर्वीचा तोटा आणि सामावून न घेतलेला घसारा, भावी नफ्यातून वजा करण्यास मुभा द्यावी, म्हणून महापारेषण हे आयकर प्राधिका-यांवर निवेदन तयार करीत आहेत, याची नोंद घेण्यात यावी. तथापि, हे निवेदन फेटाळण्यात आले तर प्रत्यक्षातील करदायित्व किमान पर्याय करापेक्षा अधिक असेल आणि त्याचा बोजा अर्थातच वीजदरावर पडेल. प्रसंगानुसार तसे करण्यासाठी महापारेषण कंपनीला आयोगाकडे जावे लागेल.

ठ)महापारेषण यांनी आर्थिक वर्ष २००४-२००५ आणि २००५-२००६करिता निव्वळ स्थिर मालमत्तेवर ४.५% परतावा अपेक्षिला आहे. वर्ष २००६-२००७ करिता आयोगाचे विनियम, २००५ अनुसार वर्षारंभीच्या भाग भांडवलावर १४% आणि भांडवली खर्चातील भाग भांडवली हिस्स्यावर ५०% परतावा गृहित धरला आहे.

ड) भारत सरकारच्या उत्पादन व शुल्क मंडळाने महापारेषण यांनी सेवा कर चुकविल्याच्या कथित प्रकरणी दि. २० व २७ जानेवारी २००६ रोजी सूचना पाठवून चौकशी सुरु केली आहे. महापारेषण यांनी वीजेच्या पारेषणावर सेवाकर देय नाही, म्हणून सदर सूचनांवर आक्षेप नोंदला आहे. महापारेषण यांच्या सेवाकर दायित्वाबाबतीत सुस्पष्टता नसल्यामुळे महापारेषण यांनी वार्षिक महसूली गरजेमध्ये सेवाकराचे प्रदान (सध्याचा सेवाकराचा दर, शैक्षणिक उपकरासहित १०.२ % असा आहे) हा खर्च धरलेला नाही. तथापि, सेवा कर भरावाच लागला तर तो पारेषण दरात समाविष्ट करावा लागेल. तसे झाल्यास नंतरच्या टप्प्यावर हा खर्च पारेषण दरात समाविष्ट करण्यासाठी आयोगाकडे जाण्याचा अधिकार महापारेषण राखून ठेवित आहे.

महापारेषण यांची एकूण महसूलाची गरज म्हणजे वरीलप्रमाणे स्थिर खर्च आणि भाग भांडवलावरील परतावा यांची एकत्रिकरण असून त्याबाबत भाग ३ मध्ये सविस्तर चर्चा केली आहे. त्याचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

रू. कोटीत

| अ.क्र. | तपशील | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|
| १ | संचालन व सुव्यवस्था खर्च | ३५६.५७ | ४१०.१३ | ४६७.०८ |
| | कर्मचारी खर्च | २४५.८३ | २६४.२८ | २९७.१३ |
| | प्रशासनिक व सर्वसाधारण खर्च | ३९.६५ | ४०.९९ | ४३.०३ |
| | दुरुस्ती व देखभाल खर्च | ७१.०८ | १०४.८६ | १२६.९२ |
| २ | घसारा(त्यासाठीच्या अग्रिमासहित) | ४७७.३० | ४९१.७८ | ४६५.०७ |
| ३ | दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ४८४.८१ | ४२९.०१ | ४२८.५६ |
| ४ | कार्यकारी भांडवलावरील व्याज धरुन इतर व्याज व वित्त आकार | ५४.९४ | ५६.५० | ६०.१५ |
| ५ | इतर खर्च ( विनियम दरातील चढउतारामुळे झालेले नुकसान) | | -०.२८ | १.४१ |
| ६ | आयकर | | ४१.०१ | ४१.९९ |
| ७ | आकस्मित खर्चासाठी राखीव निधीस अंशदान | | ४१.६१ | ४२.२६ |
| ८ | **एकूण महसूली खर्च** | **१३७३.६२** | **१४६९.७७** | **१५०६.५२** |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | २१५.९३ | २०६.२४ | ३५४.३५ |
| १० | एकूण महसूली गरज | १५८९.५५ | १६७६.०१ | १८६०.८८ |
| ११ | वजा : वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | | ७.६० | ६.५२ |
| १२ | वजा : इतर व्यवसायाकडील उत्पन्न | | ०.०० | ०.०० |
| १३ | पारेषण दरातून एकूण महसूलाची गरज | १५८९.५५ | १६६८.४१ | १८५४.३६ |

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

याप्रमाणे महापारेषण यांची एकूण महसूलाची गरज रु. १५८९.५५ कोटी (२००४-२००५) रु. १६६८.४१ (२००५-२००६) वरुन रु. १८५४.३६ कोटी (२००६-२००७) अशी वाढत जाईल, असा अंदाज आहे.

**<u>पारेषणचा विक्रीदर</u>**

पारेषण विक्रीदर पध्दतीमध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या अधिसूचनेपासून लक्षणीय बदल झाला आहे. या आधीच्या एकात्मिक म.रा.वि. मंडळाने सादर केलेल्या निवेदनात पारेषण हे एकात्मिक कार्य असल्यामुळे पारेषणाच्या विक्रीदराची सुस्पष्ट कल्पना मांडण्यात आलेली नव्हती. म्हणून पारेषण कार्यासाठी निराळा आकार देय नव्हता. सर्वच खर्चाची वसुली किरकोळ विद्युत पुरवठयाच्या दरातून करण्यात येत होती.

तीन कंपन्यामधील प्रदान करारानुसार सध्या महापारेषण यांनी पारेषित केलेल्या वीजे करिता (नोव्हेंबर २००५ पासून) महावितरण हे तदर्थ पारेषण आकार म्हणून २६ पैसे/कि.वॅट. तास  दराने प्रदान करीत आहे.

आयोगाकडून पारेषण दर निर्धारणाची पध्दत आणि रु./मे.वॅ. किंवा रु. /कि.वॅट तास इ. यापैकी मानावयाचे प्रमाण अद्याप निश्चित करावयाचे असल्यामुळे महापारेषण यांनी आर्थिक वर्ष २००६-२००७ करिता पारेषण दराचा प्रस्ताव दिलेला नाही. पारेषण दर निर्धारणाकरिता वापरता आणण्याच्या पध्दतीविषयी आयोगाने प्रसारित केलेल्या  चर्चा पत्रिकेवर महापारेषण यांनी त्यांचा अभिप्राय व अभिप्रायावरील आढावा या आधीच दिलेला आहे. महापारेषण यांची वार्षिक महसूली गरज टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स आणि बेस्ट यांच्या पारेषण व्यवसायाच्या वार्षिक महसूली गरजेत मिळवून संवर्ग राज्याकरिता संयुक्तिक पारेषण वीज दर निर्धारित करावा असे उक्त चर्चा पत्रिकेत प्रस्तावित केले आहे. आयोगाने पारेषण वीज दर निर्धारणाची पध्दती आणि महापारेषण, टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स आणि बेस्ट यांची वार्षिक महसूली गरज निश्चित केली की, समग्र राज्याकरिता संयुक्तिक पारेषण वीज दर निर्धारित करण्यास आयोग सिध्द होईल. तथापि, महापारेषण यांची समग्र महसूली आवश्यकता ही निर्धारित पारेषण दरातून भागवली जाणे, गरजेचे राहिल.

**<u>प्रार्थना -</u>**

सन्माननीय आयोगास विनंती करण्यात येते की,
(क) सदर वार्षिक महसूली गरजेविषयीची याचिका दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करावा आणि याचिका दाखल करुन घ्यावी व त्यावर कार्यवाही करावी.
(ख)काही माहिती आवश्यक पध्दतीच्या नोंदी उपलब्ध नसल्यामुळे (उदा. योजनेवर भांडवलीकरण - फॉर्म ४.४) दाखल करता आली नाही. तरी त्याबाबत सवलत देण्यात यावी. पारेषण कंपनी सदर तपशील लवकरच दाखल करील.
(ग)सादर केलेली निवेदने व याचिकेतील कारणमीमांसा विचारात घेऊन महापारेषण यांची एकूण महसूल गरज मान्य करण्यात यावी.
(घ) महापारेषण यांना आर्थिक वर्ष २००६-२००७ मध्ये त्याची वार्षिक महसूली गरज समग्रपणे वसूल करता यावी. म्हणून उचित पारेषण दर निर्धारित करण्यात यावा.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com